नवराष्ट्र

### हॉटेल व्यावसायिकांमध्ये संभ्रम

# लग्नात गाणे 'कॉपीराईट' नाही

- 'एचआरएडब्ल्यूआय'ची जनजागृती
- मुंबईत दोन खासगी फार्मांनी वसूल केले १.३७ लाख

**मुंबई,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. कोणत्याही चित्रपट अथवा म्युझिक अल्मबमधील गाणे संबंधितांच्या परवानगीशिवाय वापर करणे हे कॉपीराईट (स्वामित्व हक्क) कायद्याचे उल्लंघन मानले जाते. त्यामुळे लग्नसोहळ्यात संगीत कार्यक्रमात या कायद्याचे तर उल्लंघन होत नाही, याबाबत व्यावसायिकांमध्ये संभ्रम आहे. याचाच फायदा घेत काहींनी कॉपीराईट लायसन्स देण्याच्या बहाण्याने हॉटेल व्यावसायिकांकडून पैसे उकळण्यास सुरूवात केली आहे. त्यामुळे या विषयी जनजागृती मोहीम आखण्यात आली आहे. हॉटेल अँण्ड रेस्टॉरंट्स असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडियाने (एचआरएडब्ल्यूआय) रिकॉर्डेड म्युझिक तयार करण्यावरून हॉस्पिटालिटी सेक्टरसमोर उभ्या राहिलेल्या कॉपीराईट मुद्द्यावर जनजागृती करण्याची मोहीम आखली आहे. पुण्यात अलीकडेच झालेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर ही मोहीम आखण्यात आली आहे.

## स्टार हॉटेलमध्ये प्रकार

1. पुणे शहरातील पंचतारांकित हॉटेलमध्ये आयोजित लग्न सोहळ्यात वाजविण्यात येणाऱ्या गाण्यांसाठी कॉपीराईट परवान्याच्या नावाखाली दोन कंपन्यांकडून खंडणी उकळली जात असल्याचे उघडकीस आले.
2. नागरिकांना कॉपीराईटचा परवाना न घेतल्यास लग्न सोहळा बंद पाडण्याची धमकी कंपन्यांकडून दिली जात होती.
3. दोन दिवसांपूर्वी मुंबईत दोन खागसी फार्मांनी स्टार हॉटेलमध्ये लग्नसोहळ्यात संगीत प्रदर्शनासाठी कॉपीराईट लायसन्स जारी करण्याच्या बहाण्याने व्यावसायिकांकडून १.३७ लाख वसूल केले होते.
4. त्यामुळे असोसिएशनने आता याबाबत जनजागृती करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार पश्चिम क्षेत्रातील सर्व पोलीस आयुक्तांसोबत बैठक घेऊन अशा अवैध धंद्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.
5. सस्थेने आपल्या सदस्यांसाठी कायद्याबाबत एक परिपत्रक जारी केले आहे.





"लग्नसराई जवळ येत आहे आणि अशावेळी उद्योजकांना, ग्राहकांना कायद्याबाबत माहिती असणे गरजेचे आहे. कॉपीराईट एजेंसिसद्वारे धमकी देऊन पैसे उकळण्याचे धंदे होत आहेत. परंतु, हे अनुचित आहे.

– शेरी भाटिया, अध्यक्ष, एचआरएडब्ल्यूआय

## परवान्याची गरज नाही

- कॉपीराईट कायद्यामध्ये स्पष्ट उल्लेख आहे की, लग्न व संबंधित सामाजिक, धार्मिक कार्यक्रमांमध्ये ध्वनी मुद्रीत (रेकॉर्डिंग) चालवण्यासाठी परवान्याची गरज भासत नाही.
- असे असतानाही काही कॉपीराईट एजेन्सिस हॉटेल व्यावसायिकांकडून अवैधरित्या पैसे वसुल करत असल्याची तक्रारी मिळत आहेत, असे शेरा भाटिया यांनी सांगितले.
- त्यामुळे आम्ही या उद्योगाशी संलग्न लोकांमध्ये जनजागृती करत आहोत, असे त्यांनी सांगितले.

## कॉपीराइट विषयीचे अज्ञान

- कॉपीराइट कायद्याविषयी आपल्याकडे फारशी जागरूकता नाही. पाश्चात्य देशांमध्ये कॉपीराइटबद्दलचे विशेष अभ्यासक्रम चालवले जातात आणि प्रकाशन क्षेत्र किंवा लेखक म्हणून करिअर निवडण्यापूर्वी हे अभ्यासक्रम अनिवार्य असतात.
- आपल्याकडे तशी कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे कॉपीराइटविषयीचे अज्ञानच अधिक आहे.